# शैक्षणिक संस्थाचालक संघटना बैठक दि.०४/१०/२०१६ इतिवृत्त

| अ.क्र. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | समायोजन प्रक्रिया ही एम्.इ.पी.एस्. नियम, १९८१ नियम २६, २७ प्रमाणे चालते का ? | समायोजन प्रक्रिया नियमातील तरतुदीनुसार करणे आवश्यक आहे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | शासन / वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानंतर |
| २. | सर्व अनुदानित विद्यालयांच्या सन २०१५-१६ च्या संच मान्यतेवर "मा.सर्वोच्च न्यायालयातील अपील ३३३७/२०१६ व ३३३८/२०१६ यामधील अंतिम आदेशाच्या अधीन राहून" असा शेरा ठेवण्यासाठी सर्व जिल्ह्यांतून कॅम्प लावणे गरजेचे आहे. | याबाबत शासन / वरिष्ठ कार्यालय यांच्याकडून प्राप्त आदेश / सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. | शिक्षणाधिकारी स्तरावर | शासन / वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानंतर |
| ३. | समायोजन प्रक्रियेमध्ये खात्याकडून ९० दिवस आगावू नोटीस कर्मचाऱ्याला देणेबाबत मोकळीक ठेवणार आहात किंवा कसे ? तसेच दि.३०/९/१६ रोजीच्या श्री.कापडणीस, अवर सचिव यांच्या समायोजन प्रक्रियेसंदर्भातील पत्राबाबत. | याबाबत शासन / वरिष्ठ कार्यालय यांच्याकडून प्राप्त आदेश / सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच दि.३०/९/१६ रोजीच्या पत्रानुसार कार्यवाही करणेबाबत विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कळविण्यात आलेले आहे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | शासन / वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानंतर |
| ४. | संस्थेशी शिक्षणाधिकारी / शिक्षण उपसंचालक यांनी थेट पत्रव्यवहार करू नये, असे प्रतिबंधक आहेत का ? | अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ही संस्थेशी निगडीत बाब आहे. या कार्यालयाकडून समायोजनासंबंधित संस्थेशी पत्रव्यवहार करण्यात येतो. खात्याने अतिरिक्त कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित झाल्यानंतर प्रचलित नियमातील तरतुदीनुसार कोणत्या शिक्षकाला अतिरिक्त ठरवावे, हा अधिकार नियुक्ती प्राधिकारी या नात्याने संस्थेला आहे. या कार्यालयाकडून केला जाणारा पत्रव्यवहार संस्थेस केला जातो. शिक्षणाधिकारी यांनी अतिरिक्त समावेशनाचा पत्रव्यवहार संस्था व शाळा मुख्याध्यापक या दोहोंना करावा. | शिक्षणाधिकारी / शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |
| ५. | विद्यालयाचे वेतन थांबविण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक यांना कोणत्या नियमाने आहे. | शाळा प्रमुख म्हणून शाळा मुख्याध्यापक हे सक्षम अधिकाऱ्याचे आदेश मानत नसतील तर केवळ वेळेत कार्यवाही होण्यासाठी फक्त शाळा मुख्याध्यापकांचे वेतन थांबविण्यात येते. | --- | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | अतिरिक्त शिक्षकांच्या वेतनाबाबत | शासन / वरिष्ठ कार्यालयाच्या सूचना / आदेशानुसार अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन होत नाही, तोपर्यंत जुन्या शाळेतून वेतन अदा करण्यात येते. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ७. | अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनामध्ये अतिरिक्त शिक्षकाला कायद्याने १५० दिवसांची मुदत आपण दिली आहे का ? | याबाबत शासन / वरिष्ठ कार्यालय यांच्याकडून प्राप्त आदेश / सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. | शिक्षणाधिकारी स्तरावर | शासन / वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानंतर |
| ८. | विभागीय संघटना बैठकांमध्ये शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्या उपस्थितीबाबत. | या कार्यालयाकडून विभागीय संघटना बैठकांचे आयोजन करत असतानाच संघटना बैठकांना शिक्षणाधिकारी यांनी स्वतः उपस्थित रहाणेबाबत वेळोवेळी आदेशित करण्यात आले आहे. अपवादात्मक परिस्थितीत या कार्यालयाची पूर्व परवानगी घेवूनच अनुपस्थित राहता येईल. यापुढेही शिक्षणाधिकारी यांनी विभागीय संघटना बैठकांना स्वतः उपस्थित रहावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | नियमित |
| ९. | विभागीय संघटना बैठकांमध्ये शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना देखील बोलाविणेबाबत. | शैक्षणिक संस्थाचालक संघटनेच्या पुढील बैठकीवेळी शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना उपस्थित रहाणेबाबत सूचना देण्यात येतील. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | पुढील बैठकीवेळी |

शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर